■ वर्ष –१८, अंक–४३ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १४ जुलै २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने –६

# जगाच्या नकाशावर शिवकालीन किल्ल्यांचे सोनेरी अक्षरांत नाव!

www.attalmat.com

अट्टल मत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट!

स्वराज्याचे वैभव... छत्रपतींचे शौर्य... मराठा साम्राज्याचा अभिमान!

## वारशाचा गौरव



**20 देशांनी केले भारताला नॉमिनेट' एकूण २० देश सदस्य, त्यांना मतदानाचा अधिकार.**

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

राजगड, तोरणा, रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, पन्हाळा, लोहगड, शिवनेरी, सैलोटा, सुभानमंगळ, आणि अलिबाग किल्ला या १२ किल्लूयांचा गौरव आता जागतिक स्तरावर मान्य झाला आहे. या ऐतिहासिक क्षणाचा जल्लोष भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा यांच्यावतीने जल्लोषात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्लूयांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली होती. आता त्यांनी पत्रकार परिषद घेत 'हा शिवप्रेमींचा विजय आहे' असे म्हटले आहे. मोदींकडे देशभरातून ७ वेगवेगळ्या साईट्स गेल्या होत्या. या किल्लूयांची निवड कशी झाली याबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले हे जागतिक वारसा स्थळ म्हणजे वर्ल्ड हेरिटेज साईट घोषित करण्यासाठी नॉमिनेट केले होते. मोदींकडे देशभरातून ७ वेगवेगळ्या साईट्स गेल्या होत्या. ज्यांना जागतिक वारसास्थळ म्हणून नॉमिनेट करण्यासाठी पंतप्रधानांसमोर ठेवलं होतं. पण त्यापैकी मोदींनी जागतिक वारसा स्थळ म्हणून शिवाजी महाराजांचे १२ किल्ले नॉमिनेट करण्याचा निर्णय घेतला.

## बीडमध्ये निवृत्त पोलिस फौजदाराला खोलीत डांबून अमानुष मारहाण, तोंडावर केली लघुशंका

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

बीडमध्ये निवृत्त पोलिस फौजदाराला खोलीत डांबून अमानुष मारहाण, तोंडावर केली लघुशंका. बीड येथील माजलगावमध्ये निवृत्त पोलिस फौजदाराला अमानुष मारहाण केल्याची घटना समोर आल्याने खळबळ माजली आहे. दहा ते पंधरा लोकांनी निवृत्त पोलिस अधिकाऱ्याला खोलीत डांबले आणि दोन तास बेदम चोप दिला.

मिळालेल्या माहितीनुसार, एका निवृत्त सहाय्यक पोलिस फौजदाराकडे असलेल्या सालगड्याचे फक्त बाराशे रुपयांसाठी अपहरण करण्यात आले. आणि त्याच्याकडून दीड लाख रुपये उकळण्यात आले.

निवृत्त पोलिस अधिकारी जेव्हा सालगड्याला सोडविण्यासाठी गेले असता त्यांना देखील बेदम मारहाण करण्यात आली. आणि यानंतर त्यांना एका खोलीत डांबून ठेवण्यात आले.

दरम्यान त्यांनी पाणी मागितले असता आरोपी पैकी तीन जणांनी त्यांच्या तोंडावर लघुशंका केली.

या मारहाणीत निवृत्त फौजदाराला किरकोळ दुखापत झाली आहे. त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणी माजलगाव पोलिस ठाण्यात १० ते १२ जणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पोलिस फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

## आई तुळजाभवानीच्या भक्तांसाठी मंदिराच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय ..

पुजाऱ्यांनी केलेल्या विरोधानंतर मंदिर संस्थानाकडून आपल्या निर्णयाबाबत फेरविचार केला जातो का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**मंदिर उघडण्याच्या वेळेत बदल** – तुळजा भवानी मंदिर प्रशासनाने मंदिर उघडण्याच्या वेळेत बदल केल्याचे काल प्रसिद्धी पत्रक काढून कळवले.



**पत्रकात काय उल्लेख?** – 'श्री तुळजाभवानी मंदिरातील सर्व महंत, पुजारी, सेवेकरी व नाविक भक्तांना कळिवण्यात येते की, दिनांक १३/०७/२०२५ पासून रविवार, मंगळवार, शुक्रवार व पौर्णिमेचे सकाळचे चरणतीर्थ पहाटे ४:०० वाजता होऊन पुजेची घाट सकाळी ६:०० वाजता होईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी,' असा उल्लेख या पत्रकात करण्यात आला होता.

**पुजारी मंडळाचा विरोध** – आता याच निर्णयाला पुजारी मंडळाने विरोध केला आहे. त्यामुळे तुळजा भवानी संस्थानचा निर्णय पुन्हा वादात सापडलाय.

**काय आहे निर्णय?**– मंगळवार, शुक्रवार, रविवार आणि पौर्णिमेच्या दिवशी पहाटे ४ वाजता मंदिर उघडले जाणार आहे. तर पुजेची घाट सकाळी ६ वाजता होणार आहे, असे संस्थानच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले होते.

**पुजाऱ्यांचा संस्थानला सवाल** – तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांनी मंगळवार, शुक्रवार, रविवार, पौर्णिमा या दिवशी मंदिर २२ तास सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला होता. मग हा निर्णय आम्हाला विश्वासात न घेता का घेतला ? असा प्रश्न पुजारी संस्थानला विचारत आहेत.

**पुजाऱ्यांचा दावा** – रात्री १ वाजता मंदिर दर्शनासाठी खुले केल्यास गरीब भक्तांना याचा फायदा होत होता. दिवसभर पेड दर्शनच्या माध्यमातून इतर भाविक दर्शन घेत होते.

## गरिबांच्या हडप केलेल्या जागा त्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई :** गरिबांच्या जागा धाकदपट करून, जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून हडप केल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत. संपूर्ण राज्यात अशा जागांची तपासणी करून गरिबांच्या हडप केलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल, अशी घोषणा विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. या संदर्भात सदस्य असलम शेख यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य सर्वश्री योगेश सागर, अबू आझमी यांनीही सहभाग घेतला. प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, कल्याण तालुक्यातील मौजे गोळवली येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार यशवंत भीमराव आंबेडकर यांच्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाली.

## राज्यात वाईन शॉप परवान्याची स्थगिती उठवली!

# ३२८ नवे मद्यविक्री परवाने दिले जाणार

मुंबई: राज्य सरकारने गेल्या ५० वर्षांपासून वाईन शॉप परवान्यांवर असलेली स्थगिती उठवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचा महसूल वाढवण्यासाठी नवीन मद्यविक्री परवाने देण्याची योजना असल्याची माहिती समोर येत आहे. विदेशी मद्यनिर्मिती परवाने देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात येणार आहे.

**नवे परवाने थेट दुकानांना नव्हे, तर कंपन्यांना दिले जाणार** – राज्यात ३२८ नवे मद्यविक्री परवाने दिले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. हे नवे परवाने दुकानांना नाही तर कंपन्यांना दिले जाणार आहेत. प्रत्येक कंपनीला ८ परवाने मिळणार असून, हे




परवाने भाड्याने देण्याची परवानगी देखील असेल. या परवाना वितरणासाठी स्थापन होणाऱ्या समितीत अजित पवार यांचा समावेश आहे.

मात्र, कॅपोव्हिटेज या मद्य निर्मिती कंपनीच्या संचालकपदी जय पवार असल्याने हितसंबंधाचा मुद्दा उपस्थित होऊ शकतो, असा आरोप विरोधकांनी केला आहे.

वेगवेगळ्या योजनांचा सरकारच्या तिजोरीवर भार पडतोय. याची कबुली खुद्द सत्तेमधील नेत्यांनीच वेळोवेळी दिली आहे.. त्यामुळे राज्याचं उत्पन्न कसं वाढणार? यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. अशी प्रतिक्रिया मद्य परवान्यांवर बोलतांना छगन भुजबळ यांनी दिली आहे.

## संपादकीय

# महाराष्ट्राभिमानी मनाला रोमांचित करणारी बाब

युनेस्कोच्या समितीकडून महाराष्ट्रातील १२ गड किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आले आहे आणि यासंबंधींची घोषणा नुकतीच राज्य सरकारकडून करण्यात आली. ही घोषणा समस्त मराठी जनांच्या आणि महाराष्ट्रीय यांची छाती गर्वाने भरून टाकणारी आहे यात काही शंका नाही. कारण महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांनी आपल्या दूरदर्शी धोरणाने आणि व्यापक हित लक्षात घेऊन महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापले. त्यांचे जतन आता होणार आहे आणि यामुळे ही बाब निश्चितच प्रत्येक महाराष्ट्राभिमानी मनाला रोमांचित करणारी आहे. महाराष्ट्रातील ११ किल्ले ज्यात रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग तसेच खांदेरी यासह तामिळनाडूतील जिंजी या किल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

या १२ किल्ल्यांना जागतिक वारसास्थळ म्हणून जाहीर करण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेले आहेत पण या किल्ल्यांचे एक ऐतिहासिक महत्त्वही आहे. कारण ते प्रत्येक स्वराज्यातील महत्त्वपूर्ण घटनेचे साक्षीदार आहेत. छत्रपती शिवरायांनी स्वराज्य निर्मिती आणि रक्षणासाठी ज्या अनेक किल्ल्यांची उभारणी केली आणि त्यांच्या जोरावर मुघल साम्राज्याला टक्कर दिली आणि बलदंड मुघल साम्राज्याला पाणी पाजले त्या किल्ल्यांचा सम वेश जागतिक वारसा स्थळांच्या यादीत होणे ही प्रत्येक भारतीयासाठी निश्चितच गौरवास्पद बाब आहे. यात तामिळनाडूतील जिंजी हे एक ठिकाण आहे हे तामिळनाडूतील असले तरीही शिवरायांशी जवळून संबंधित आहे. त्यामुळे त्याचा या यादीत समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील किल्ले हे स्थापत्य कलेसाठी ओळखले जातात आणि राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही हे किल्ले एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे. शत्रूच्या नजरेस न येता त्यांचे स्थापत्य असे विलक्षण आहे की, त्यामुळे भल्याभल्यांची मती गुंग व्हावी. शिवरायांच्या राजकीय चातुर्यास ज्याला ॲक्युमेन म्हटले जाते त्याला दाद द्यावी की, स्थापत्यकलेच्या आविष्कारास दाद द्यावी असा प्रश्न पडतो. यातील प्रत्येक किल्ला हा मराठा दुर्ग शास्त्रातील अभूतपूर्व चमत्कार आहे आणि त्याची माची, तटबंदी, बुरूज, दरवाजे आणि खंदकानी सुरक्षित केले आहेत. त्यातच शिवरायांच्या युद्धकौशल्याचा आणि राजकीय डावपेचांचा प्रचंड आविष्कार दिसून येतो.

अर्थात हे होण्यासाठी राज्यसरकारने काटेकोर नियोजन केले यात काही शंका नाही. कारण राज्यसरकारने अत्यंत काटेकोरपणे अभ्यास करून प्रस्ताव युनेस्कोच्या आणि भारतीय पुरातत्त्व खात्याच्या वस्तुसंग्रहालय संचालयाकडे पाठवला आणि त्यानंतर युनेस्कोच्या तज्ज्ञांनी या किल्ल्यांची पाहणी केली आणि काळजीपूर्वक तपासणी केल्याअंती या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत समाविष्ट केले.

अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राज्यातील अभ्यासकांशी सातत्यपूर्ण असलेला संवाद आणि महाराष्ट्रातील या किल्ल्यांना नामांकन मिळावे म्हणून त्यांनी केलेला पाठपुरावा याला अखेर यश मिळाले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी युनेस्कोकडे सातत्याने जाऊन पाठपुरावा केला. त्यामुळे हे यश मिळाले. नंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हा राज्यासाठी अभिमानाचा गौरवशाली क्षण आहे असे जे म्हटले ते कुणीच अनाठायी नाही असे कुणीच म्हणू शकणार नाही. कारण शिवरायांचे हे किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाले यात संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव झाला आहे. रायगड हा तर महाराष्ट्रीयांचा मानबिंदू आहे तर राजगड, प्रतापगड हेही किल्ले शिवरायांच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देतात. शिवनेरी तर शिवरायांचे जन्मस्थान आहे.

त्यामुळे हे प्रत्येक किल्ले शिवरायांच्या जीवनातील महत्त्वाच्या क्षणांचे साक्षीदार आहेत, त्यांचे जतन करणे महत्त्वाचे आहेच, पण आता तर ते जागतिक वारसायादीत समाविष्ट झाले असल्याने त्यांचा गौरव वाढला आहे. आपलाही गौरव वाढला आहे. मुख्यमंत्री फडणवीस त्याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसायादीत आल्याबद्दल प्रत्येक नागरिकाचे अभिनंदन केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तो क्षण जितका महत्त्वाचा होता तितकाच आजचा आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांचे अभिनंदन करू तितके कमी आहे.

आता या किल्ल्यांची जपणूक आणि जतन करायला हवे आणि तेथील ऐतिहासिक वारशांचे जतन करायला हवे. हे तितके सोपे नाही. कारण खरी जबाबदारी जतन करण्याचीच असते. आता खरी जबाबदारी आहे ती आपली. कारण आपल्याकडे लोक ऐतिहासिक स्थळी पर्यटनाला जातात ते निव्वळ मजा करण्यासाठी. तेथे अनेक नको असलेल्या गोष्टी पडून असतात आणि ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी कसे वागावे आणि कशी वर्तणूक असावी याचे शिक्षण आपल्याला दिले जात नाही. त्यामुळे आपण जातो तेथे त्या स्थळाला अवकळा आणतो. अगदी रायगडावरही अस्वच्छता पसरलेली असते आणि दरवर्षी आपल्याकडे काही संस्था तिथे जाऊन स्वच्छता करतात. त्याना असे करण्याची वेळ येऊ नये.

# चला सिद्ध करुया; एसटीवरील प्रेम, विश्वास, निष्ठा व गरज!

**प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरू कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरू कराव्यात. 'हात दाखवा, गाडी थांबवा' ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाताहे. प्रवासी राजा दिनावर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा मार्गदर्शक संकलित लेख प्रवाशांच्या सेवेशी सविनय सादर... संपादक.**

**(एसटी प्रवासी राजा दिन विशेष.)**

एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी वजा सूचना यांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरणासाठी आता राज्यातील प्रत्येक आगार- डेपोमध्ये दर सोमवारी व शुक्रवारी एसटी प्रवासी राजा दिन आयोजित केला जाईल. त्यानुसार एसटीच्या विभाग नियंत्रकांना एका आगारात जाऊन प्रवाशांच्या समस्या, तक्रारी, सुचना ऐकून घ्याव्या लागणार आहेत. 'प्रवासी आपला आराध्य दैवत; तर परिवहन विभाग उपासक!' असेच काहीसे चित्र दिसेल. एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या भन्नाट संकल्पनेतून हा प्रयोग राबवला जाणार आहे. एसटी महामंडळाने या प्रकल्पानुसार प्रवाश्यांच्या समस्यांना गांभिर्याने घेत त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजनेसाठी हा उपक्रम राबवण्याचे निश्चित केले आहे.



त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. ही अभिनव योजना दि.१५ जुलै २०२४पासून सुरू होणार आहे. शहरी व खेडूत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी-शिक्षक आपल्या समस्या-तक्रारी, सुचना लेखी स्वरूपात दर सोमवारी व शुक्रवारी संबंधित आगारात सकाळी १० ते २ या वेळेत मांडू शकतात. त्यावर विभाग नियंत्रक तातडीने कार्यवाही करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रवासी राजा दिन कोणत्या दिवशी कोणत्या आगारात होणार आहे, याचे वेळापत्रक विभाग नियंत्रक त्या त्या वेळी जाहीर करतील. विशेष म्हणजे प्रत्येक लेखी तक्रारीची नोंद ठेवण्यात येणार असून याबाबत काय कार्यवाही केली आहे, यावर मध्यवर्ती कार्यालय लक्ष ठेवणार आहे. त्यावर योग्य कार्यवाही तसेच तक्रारदारांचे समाधान करणारी योग्य उपाययोजना करणे संबंधीत कार्यालयास भाग पडणार आहे, असा विश्वास वाटतो.

एसटीच्या विविध बसेस मधून दररोज सुमारे ५४ ते ५५ लाख प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली जाते. प्रवाशांना एसटी बसस्थानक, बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे ही स्वच्छ, निर्जंतुक आणि टापटीप असावीत असे वाटते. तसेच एसटी बसेस स्वच्छ व वेळापत्रकानुसार वेळेत मार्गस्थ व्हाव्यात, ठरलेले थांबे घ्यावेत, चालक-वाहक यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे. कमी केलेल्या बसफेऱ्या पुनश्च सुरू कराव्यात. प्रवाशी संख्या विचारात घेऊन ज्यादा बसफेऱ्या वाढवाव्यात. रस्ता तयार असलेल्या गावांसाठी नवीन बसफेऱ्या सुरू कराव्यात. 'हात दाखवा, गाडी थांबवा' ही योजना पुन्हा नियमितपणे राबवली जावी, अशी किमान अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त केली जाताहे. यासंबंधित प्रवाशी तक्रारींचे निराकरण वेळेत न झाल्याने प्रवाशांना गैरसोईचा सामना करावा लागतो. या समस्यांचे निराकरण स्थानिक पातळीवर तातडीने होऊ शकते. प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य होणार आहे. अर्थात, प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या दि.१५ जुलै २०२४ पासून प्रवासी राजा दिन या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व प्रवासी बंधू-भगिनींनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे आणि आपले एसटी बसवरील प्रेम, विश्वास, निष्ठा व गरज आजही काही कमी झाले नाही, हे सिद्ध करून दाखवावेच.

प्रवासी सेवेचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रवाशांच्या समस्यांचे वेळीच निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास प्रवाशांना समाधानकारक सेवा देणे एसटी महामंडळाला शक्य सोयीचे होणार आहे. अर्थात प्रवाशांचे महत्तम समाधान हा उद्देश ठेऊन येत्या सोमवार, दि.१५ जुलै २०२४पासून 'एसटी प्रवासी राजा दिन' या अभिनव योजनेचे आयोजन करण्यात येणार आहे, ही एक अत्यंत महत्वाची, आनंदाची आणि अभिमानास्पद बाब आहे.

आपण कधी कधी लांब पल्ल्याचा किंवा अपरिहार्य प्रवास अनिच्छेनेच करत असतो. यादरम्यान अनेकदा प्रवाशांना एसटी संबंधित विविध समस्यांचा सामना करावा लागतो. अस्वच्छ स्थानक, गलिच्छ प्रसाधनगृहे, वाहकांची अरेरावी, बंद पडणाऱ्या गाड्या, थांब्यावरील हॉटेलमध्ये महागडी सेवा या सार्वत्रिक तक्रारी आहेत. गाडी वेळेत न सुटणे किंवा ऐनवेळी रद्द होणे, गळक्या किंवा नादुरुस्त बसेस लावणे, हा अनुभवही वारंवार येतो. विशेषत: स्कुलबसेस व शिवशाहीबद्दल तक्रारी सर्वाधिक आहेत. या सर्व तक्रारी आता थेट विभाग नियंत्रकांसमोर मांडता येतील आणि सुखद, समाधानी सेवा निश्चितच मिळेल, अशी अपेक्षा करुया!

!! एसटी प्रवासी राजा दिन मोहिमेच्या सर्व प्रवासी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

# गल्ले बोरगाव येथील दलित स्मशानभूमीचे काम रखडले; तहसील समोर ग्रामस्थांचा ठिय्या आंदोलनाचा इशारा

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

तालुक्यातील गल्लेबोरगाव येथील ग्रामपंचायत अंतर्गत असल्यामुळे गेल्या ६५ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या दलित स्मशानभूमीच्या विकासाचे काम तब्बल १० महिन्यांपासून रखडले असून, यामुळे ग्रामस्थांत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या कामाबाबत ठेकेदाराकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्यामुळे संतप्त नागरिकांनी स्मशानभूमीत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा माध्यमांना बुधवारी दिला आहे.

पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे तालुका अध्यक्ष राजअनंत सुरतकर यांनी सांगितले की गल्ले बोरगाव येथील ही दलित स्मशानभूमी खुलताबाद भूमी अभिलेख कार्यालयाच्या जुन्या नोंदींनुसार एक हेक्टर दहा गुंठ्यांवर असून, येथे आजवर दफनविधी व अग्निसंस्कार केले जात होते. सन २०२४-२५ मध्ये चौदाव्या वित्त आयोग व सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून स्मशानभूमी सुशोभीकरण,सम ाज मंदिर व कंपाउंड वॉलसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. गंगापूर खुलताबाद विधानसभा म तदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या पुढाकाराने हा निधी उपलब्ध झाला होता.

या कामाचे ठेके खुलताबाद येथील कुलकर्णी



नावाचे व्यक्तींना यांना देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात हे काम चौधरी नावाच्या दुसऱ्याच व्यक्तीकडून होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. २०२४ च्या ऑगस्ट महिन्यात नारळ फोडून कामाला सुरुवात झाली होती. २३१८ फ ूट आकाराच्या चार कॉलमच्या कामाला सुरुवात झाली असली तरी मार्च एप्रिलमध्ये केवळ फ ूटिंग झाले असून त्यावर पाणीही टाकलेले नाही. बुधवारी ठेकेदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

या रखडलेल्या कामाच्या विरोधात ग्राम पंचायत सदस्य संदिप शिरसाठ, बाळू शिरसाठ, आनंद शिरसाठ, सिद्धार्थ शिरसाठ, सुभाष खंडागळे यांच्यासह कमलबाई शिरसाठ, ताराबाई शिरसाठ, उषाताई सुरतकर, लिलाबाई शिरसाठ, निता शिरसाठ, सुंदराबाई शिरसाठ, मंगलताई शिरसाठ, आशा शिरसाठ, लक्ष्मीबाई शिरसाठ व इतर म हिला-पुरुषांनी ठिय्या आंदोलन करत ठेकेदाराच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे.काम तात्काळ पूर्ण न झाल्यास तहसील कार्यालयावर आमरण उपोषण व रास्ता रोको करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या प्रकरणी पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष राजअनंत सुरतकर यांनी माध्यमांद्वारे तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा दिला असून, पालकमंत्री संजय शिरसाट व आमदार प्रशांत बंब यांना निवेदन देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## ‘गुड मॉर्निंग चषक’ क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न;
# कारगिल वॉरीयर्स संघ ठरला पहिला विजेता

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

शहरातील बीड बायपास परिसरात रेणुका माता कमान येथे आयोजित करण्यात आलेली ‘गुड मॉर्निंग चषक’ रेणुका माता कमान टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात नुकतीच संपन्न झाली. ही स्पर्धा यंदा पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली असून, स्थानिक पातळीवरील क्रिकेटपटूंना संधी देण्याचा हेतू या आयोजनामागे होता.

स्पर्धेचे आयोजन बद्रीनारायण मोरे (अण्णा), धरम बारवाल (डी.जे.सर), योगेश चव्हाण, संतोष तुपे, सचिन कोरे, इमरान कादरी, योगेश राजपूत, तय्यब खान, इम्रान खान व ज्वागत भाई यांच्या पुढाकारातून करण्यात आले. स्पर्धेला सचिन शिंदे, मनोज पवार, दीपक मामा आणि अमोल कोल्हे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



चुरशीच्या अंतिम सामन्यात कारगिल वॉरीयर्स संघाने दमदार खेळ करत बी.एम. वॉरीयर्स संघावर विजय मिळवत प्रथम विजेतेपद आपल्या नावे केले. सुनील डावकर याला मॅन ऑफ द मॅच, डॉ. आशुतोष सुसर याला उत्कृष्ट फलंदाज, तर रामेश्वर राजपूत याला उत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेदरम्यान प्रेक्षकांची उत्स्फूर्त गर्दी आणि खेळाडूंमध्ये स्पर्धात्मक उत्साह पाहायला मिळाला. आयोजकांनी पुढील वर्षी ही स्पर्धा अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात घेण्याचे संकेत दिले आहेत.

# खाजगी प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ द्या

## महाराष्ट्र राज्य खाजगी प्राथमिक शाळा मुख्याध्यापक - संघटनेची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

मुंबई : महाराष्ट्र राज्य खाजगी प्राथमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेच्या वतीने राज्यातील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांमधील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ मिळावा, यासाठी राज्य सरकारकडे सविनय निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन संघटनेचे राज्याध्यक्ष मा. श्री. प्रकाश सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री मा. एकनाथराव शिंदे व शिक्षणमंत्री मा. दादासाहेब भुसे यांना देण्यात आले.

या निवेदनात प्राथमिक मुख्याध्यापकांनाही माध्यमिक शाळांप्रमाणे अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ द्यावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. माध्यमिक शाळांमध्ये हा लाभ पूर्वीपासूनच लागू असून, प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापकांना मात्र यापासून वंचित ठेवले गेले आहे. या अन्यायकारक स्थितीवर उपाय म्हणून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संघटनेने यावेळी असेही स्पष्ट केले की, शाळेतील मुख्याध्यापक हे शैक्षणिक व प्रशासकीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असतात. त्यामुळे त्यांना देखील हक्काचे लाभ देणे आवश्यक आहे. पूर्वी हा लाभ काही अंशी दिला जात होता, मात्र सध्या तो बंद करण्यात आल्याने अनेक मुख्याध्यापक आर्थिक अडचणीत आले आहेत. अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देण्यात आल्यास मुख्याध्यापकांचा मनोबल वाढेल व शिक्षण व्यवस्थाही अधिक सक्षम बनेल.

या निवेदनावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, लवकरच यासंबंधी निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यामुळे संघटनेच्या मागणीकडे शासन गांभीर्याने पाहत असून, लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे.

मुख्याध्यापक संघटनेच्या या प्रयत्नाचे अनेक स्तरातून कौतुक होत असून, खाजगी प्राथमिक शिक्षण क्षेत्रासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

# शिरजगाव शिवारात दिवसाढवळ्या डोक्यात वार करून खून

कन्नड
(अट्टल मत प्रतिनिधी)

कन्नड – (प्रतिनिधी) – दी.१२ रोजी तालुक्यातील सिरजगाव शिवारातील शेतात पाऊणे बारा वाजेच्या सुमारास अज्ञात हल्लेखोरांकडून कोयत्याने डोक्यावर वार करून एका इसमाची निघृण हत्या करण्यात आली असून या घटनेने तालुक्यात सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

राजाराम ऊर्फ राजु भावसिंग चुंगडे (वय ४७) रा. सिरजगाव ता. कन्नड असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. राजू चुंगडे हे सकाळी आपल्या गट नंबर २८ मधील जैतापूर ते सिरजगाव रोडवरील शेतात म काला खत टाकण्यासाठी दोन ते तीन मजूर येणार असल्याने शेतात गेले होते. यावेळी त्यांनी मजुरांना रासायनिक खत मिक्स करून दिले तर मजूर खताच्या गोण्या घेऊन शेतातील घरामागे असलेल्या मकाकडे गेले. याचवेळी राजू चुंगडे हे घरासमोर एकटेच असताना अचानक दुचाकीवरून दोन पुरुष व एक महिला तिथे आले. त्यांनी गाडीवरून उतरून राजू यांच्यावर कोयत्याने सफासप वार करण्यास सुरवात केली.

यावेळी राजू चुंगडे यांनी डोक्यावर होत असलेले वार हातावर झेलण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या एका हाताची बोटे तुटून जमीनवर पडली तर डोक्यात जोरादर प्रहार झाल्याने ते रक्ताच्या थारोळ्यात पडले. यावेळी त्यांनी जोरजोरात आरडाओरडा केल्याने मागे मकात खत टाकणारे मजूर धावत येत असताना त्यांना तोंडाला रुमाल

**कन्नड तालुक्यातील घटना – तालुक्यात खळबळ**

बांधलेले हल्लेखोर पसार होताना दिसले. तर डोक्यात जबर वार झाल्याने राजू चुंगडे जागीच गतप्राण झाले असल्याची माहिती गावकऱ्यानी पोलिसांना दिली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली घेऊन मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह कन्नड येथील ग्रामीण रुग्णालय येथे दाखल केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. तर आरोपीना अटक करा मगच प्रेताचे शवविच्छेदन करा म्हणून नातेवाईक संताप व्यक्त करत होते. राजू चुंगडे यांच्या पश्चात आई,पत्नी,तीन मुले,भाऊ, भावजय असा परिवार असून, त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमागचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून, पोलिस विविध अंगाने कसून तपास करत आहेत. आरोपीचा लवकरात लवकर शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईका व ग्रामस्थांकडून होत आहे.

घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग,उपविभागीय पोलीस अधिकारी विजय कुमार ठाकुरवाड, ग्रामीण पोलीस निरीक्षक रामचंद्र पवार यांनी भेट दिली. मुलगा सुरज राजाराम चुंगडे याने दिलेल्या फिर्यादि नुसार दोन अनोळखी अज्ञात पुरुष व एक अज्ञात अनोळखी म हीला विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि रामचंद्र पवार करत आहे.

**एक मुलगा पोलीस दलात –**

राजू चुंगडे यांचा एक मुलगा पोलीस दलात भरती झालेला असून त्याचे प्रशिक्षण अंतिम टप्प्यात आहे. तर राजू चुंगडे यांना म ानणारा एक मोठा मित्र परिवार असून ते राजू भाऊ नावाने परिचित होते घटनेची माहिती कळताच नातेवाईकांसह मित्र परिवार सुद्धा ग्रामीण रुग्णालय व ग्रामीण पोलीस ठाण्याच्या आवारात जमा झाला होता.

## ‘लोकसंपर्कात अग्रेसर... लोकसेवेत निष्ठावान!’



छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघाचे शिवसेनेचे लोकप्रिय खासदार मा. संदीपनराव भुमरे साहेब यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, जिल्हाप्रमुख रमेश पवार.

## तातडीने कारवाई करुन न्याय मिळवून द्यावा- शिवराणा सेवा संघ



स्व. राजू चुगडे वय ४२ वर्ष पश्चात दोन मुलं, पत्नी, सरपंच पदावर शिरगाव ता कन्नड कार्यरत असलेल्या लोकप्रतिनिधीची हत्या १२ जुलै रोजी सकाळी दहा दरम्यान आरोपी मोटारसायकल वरून येऊन निर्गुण हत्या करून निघून गेले तोंडावर पट्या बांधून धारदार शस्त्राने २० पेक्षा अधिक वार करून हत्या करून मोकाट आहेत. पोलिस कन्नड ग्रामीण तपास करत आहेत. या हत्यामुळं गुंडांची दहशत निर्माण झाली आहे. दिवसा ढवळ्या हि हत्या झाली आहे. जर गावांचे पहिलें नागरीक सुरक्षित नाही या घटनेचा निषेध शिवराणा सेवा संघ वतीने करण्यात येतं आहेत.

तातडीने कारवाई करुन अटक करण्यात यावी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा पोलिस अधीक्षक छत्रपती संभाजीनगर यांनी सदर तपास प्रकरणी गुन्हा शाखेकडे तपास सोपवून दखल मुसक्या बांधून न्याय द्यावा सदर परिवारातील मुलगा रत्नागिरी येथे पोलिस खात्यात नोकरी ला आहे आल्यावरच अंत्यविधी निर्णय घेण्यात आला. आक्रोश पंचक्रोशीतील हजारो लोकांचे अश्रू अनावर झाले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्याची हि हत्या क्रूर असुन तातडीने कारवाई करुन न्याय मिळवून द्यावा, शिवराणा सेवा संघ एल.डी.ताटू ॲड. सुभाष कोकुल्डे, आनंद बारवाल, भाऊसिंग बैनाडे, अंजली कोकुल्डे.

# विमानतळ परिसरात लेझर, बीम लाईट्स वापरावर बंदी

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात विमानतळाच्या आजुबाजुच्या परिसरात असणारे फार्म हाउस, मंगल कार्यालय येथील विवाह सोहळा तसेच अन्य सामाजिक कार्यक्रमामध्ये लेझर लाईटस, बीम लाईटसच्या वापरावर दि.९ सप्टेंबर २०२५ पर्यंतच्याकालावधीसाठी बंदी घालण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १६३(१) व (३) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व फार्म हाऊस, मंगल कार्यालय, विवाह सोहळा, सामाजिक कार्यक्रम इ. च्या आयोजक, मालक यांनी लेझर लाईट्स, बीम लाईट्स याचा वापर करु नये. कारण अशा वापर केल्यामुळे पायलटच्या दृष्याात अडथळा निर्माण होऊन लँडीग व टेकऑफ करण्यापूर्वी लक्ष विचलित होऊन दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या आदेशाचे उल्घंन करणाऱ्यावर भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ अन्वये व प्रचलित कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल व तो शिक्षेस पात्र राहील,असेही आदेशात स्पष्ट केले आहे.

# बिहारच्या मतदारयादीत बांगलादेश, म्यानमार, नेपाळच्या नागरिकांची नावं

पाटणा : बिहारच्या विधानसभेचा कार्यकाळ लवकरच पूर्ण होणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदारयादीची सखोल तपासणी सुरू केली आहे. या तपासणीत धक्कादायक माहिती हाती आली आहे. बिहारच्या मतदारयादीत बांगलादेश, म्यानमार, नेपाळच्या नागरिकांची नावं आढळली आहेत. ही नावं यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यादीतील या गंभीर चुकांसाठी निवडणूक आयोगाने ३५ बीएलओ आणि २६ सुपरवायझर यांचे वेतन स्थगित केले आहे. या अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत.

निवडणूक अधिकारी बिहारमध्ये घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करत आहेत. ही तपासणी सुरू असतानाच बनावट कागदपत्रांच्या मदतीने अनेक विदेशी नागरिकांनी यादीत नावाचा समावेश करुन घेतल्याचे आढळले आहे. ही माहिती मिळताच निवडणूक आयोगाने मतदारयादीत घुसखोरी करणाऱ्या बांगलादेश, म्यानमार, नेपाळच्या नागरिकांची नावं यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. निवडणूक आयोगाची धडक कारवाई सुरू झाल्यापासून विरोधी पक्षांमध्ये अस्वस्थता दिसत आहे. काँग्रेसचे नेते निवडणूक आयोगाची कारवाई थांबवण्यासाठी कायदेशीर मार्गांचा अवलंब करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण न्यायालयीन पातळीवर त्यांना पुरते अपयश आल्याचे दिसत आहे. निवडणूक आयोग ३० सप्टेंबर २०२५ रोजी बिहारच्या मतदारांची सुधारित यादी प्रसिद्ध करणार आहे. ही यादी प्रसिद्ध करण्याआधी बोगस मतदारांची नावं वगळण्याचे काम सुरू आहे. बिहार विधानसभेचा कार्यकाळ २२ नोव्हेंबर २०२५ रोजी संपणार आहे. याआधी निवडणूक घेऊन निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित आहे. यामुळे बिहारमध्ये मतदार यादीच्या छाननीचे काम प्राधान्याने सुरू करण्यात आले आहे. बिहारमध्ये विधानसभेच्या २४३ जागांसाठी निवडणूक होणार आहे. पण या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच मतदार यादी छाननीच्या प्रक्रियेमुळे विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरल्याचे दिसत आहे. आसाम, पदुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल येथे २०२६ मध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे.

# दिल्ली गेट येथील बारबेरीयन जीमच्या संचालकांनी मागील १५ वर्षाचा व्यावसायिक कर तसेच अग्निशमण विभागाचा दंड भरलाच नाही?

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

दिल्ली गेट येथील बारबेरीयन जमीन चे संचालक अहेमद शेख यांची भव्य ३ मजली इमारत असून मागील १५ वर्षापासून त्यांनी कुठल्याही प्रकारचा व्यावसायिक कर हा मनपा कार्यालयाला भरला नाही या इमारतीमध्ये राहते घर, जमीन आणि व्यापारी लोकांची दुकाने असून मागील पंधरा वर्षामध्ये त्यांनी लाखो रुपयांचा कर चुकवला आहे. असे निवेदन भीमशक्तीचे शहर जिल्हा अध्यक्ष सतीश नरवडे यांनी आयुक्तांना दिले आहे.

**रस्ता रुंदीकरणमध्ये ही इमारत अतिक्रमणामध्ये बाधीत –** मागील काही दिवसांपूर्वी दिल्ली गेट ते हर्सल या मार्गावरील रस्ता रुंदीकरणमध्ये ही इमारत अतिक्रमणामध्ये बाधीत असून थोड्या प्रमाणावर या इमारतीमध्ये अतिक्रमण विभागाने नावापूरतेच कार्यवाही केली. या जिमसंचालकाचे वरिष्ठ अधिकारी, मंत्री, राजकारणी यांच्याशी मोठ्या प्रमाणावर ओळख असल्या कारणाने मनपा प्रशासन दबावाखाली यांच्यावर पूर्णपणे कार्यवाही करत नाही करत नाही.

खर तर दिल्ली गेट परिसर हा ऐतिहासिक असून काही अंतरापर्यंत पूरातत्व विभागाची या ठिकाणी नियम व बंधने आहे. बारवेरीयन जिमच्या जागेवर अगोदर पूरातत्व विभागाची भिंत होती. परंतू ती पाडून त्यांनी या जागेवर सुद्धा त्यांनी अतिक्रमण केले आहे. त्यांचे पेपर तपासून त्यांच्या ताब्यामध्ये किती जागा आहे. आणि कागदोपत्री किती जागा आहे याचा सुद्धा बोध आपल्या कार्यालयाला होणे आवश्यक आहे.

## भीमशक्तीचे शहर जिल्हा अध्यक्ष सतीश नरवडे यांनी आयुक्तांना निवेदन दिले





## अतिक्रमण : राजकीय दबाव आणून थातूरमातूर कार्यवाही केली आणि गुंठेवारीचे दहा लाख रुपयांचा चेक मनपा कार्यालयाला दिला

काही दिवसापूर्वी अतिक्रमणाची कार्यवाही चालू असतांना बारबेरीयन जिगचे संचालक यांनी आपल्या कार्यालयातील वरीष्ठ अधिकाऱ्याला हाताशी धरुन व अतिक्रमण विभागाला राजकीय दबाव आणून थातूरमातूर कार्यवाही केली आणि गुंठेवारीचे दहा लाख रुपयांचा चेक मनपा कार्यालयाला दिला परंतू यामध्ये त्यांनी मागील १५ वर्षाचा कर सुद्धा बुडवला आहे. आणि यामध्ये पुरातत्व विभागाचे नियम व अटी यांचे सुद्धा पायमल्ली करून मनपा प्रशासनाला चुकीची माहीती देऊन गुंठेवारीची प्रोसीजर करत आहे. यामध्ये त्यांनी मनपा कार्यालयाची कुठल्याही प्रकारची रितसर परवानगी घेतली नाही. काही महिन्याअगोदर या जिममध्ये भयानक आग लागून लाखो रुपयांचा माल जळून खाक झाला होता. त्यावेळेस ही अग्निशमण विभागाची परवानगी त्यांच्याकडे नव्हती आणि आजही नाही. या संदर्भात ही त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही आणि फायरची परवानगी आणि दंड वसूल करण्यात यावा. वरील सर्व बाबी गांभीर्यपूर्वक घेऊन बारबेरीयन जीम चे संचालक अहेमद शेख यांच्यावर म ागील १५ वर्षाचा व्यावसायिक आणि इतर कर व्याजा सहीत आकारण्यात यावा तसेच अग्निशमण विभागाचे परवाना आणि त्यांचा दंड व्याजासहीत वसूल करण्यात यावा. गुंठेवारी करते वेळेस नियमानुसारच जागा बघून आणि पुरातत्व विभागाचे नियम व अटी लक्षात घेऊन त्यांना नियमीत करण्यात यावे असे निवेदनात म्हटले आहे.

## लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद एंजल्सच्या वतीने पर्यावरणवादी प्लास्टिक मुक्त शाळेच्यासाठी कापडी पिशव्यांचे वाटप




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

राजाबजार परिसरातील पि.यू .जैन माध्यमिक विद्यालयात व प्राथमिक विभागात लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद एंजल्स च्या वतीने आषाढी एकादशी च्या निमित्ताने पर्यावरण संरक्षण या विषयावर चित्रकला स्पर्धा इयत्ता, दहावीतील गुणवंत विद्यार्थी सन्मान, दिशा राजू चिपोले, ज्योती शिंदे, धनश्री महाले, श्रुतिका म हतोले, अनुष्का कंदुर यांच्या सह अन्य विद्यार्थिनींना स्मृतिचिन्ह भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले व चित्रकला स्पर्धेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी डी यू जैन बालक मंदिरच्या बाल गोपालांनी अतिशय सुंदर अशा महाराष्ट्रीयन पारंपारिक वेशभूषेत तुळशी वृंदावन घेऊन, टाळ मृदुंग वाजवत, नाचत गात पालखी सोहळा आयोजित केला होता. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुन्दर संगीत वाद्य वृंदासह गीत सादर करून सर्वांची मने जिंकली.

याप्रसंगी जैन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महावीर सेठी, मुख्याध्यापक विजय पाटोदी, कविता ठोळे , सुवर्णा शहा यांची उपस्थिती होती. लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद एंजलच्या वतीने अध्यक्षा नीतू शिंदे, सचिव रीता जयेश पुरवार, कोषाध्यक्ष राखी पांडे, रुचिका जयस्वाल भावना गौरक्षक, वैशाली बंब आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद एंजिल्स

सर्व विद्यार्थ्यांना फळ व खाऊ वाटप करून आषाढीचा आनंद द्विगुणित केला. सोबतच पर्यावरणवादी प्लास्टिक मुक्त शाळेच्या साठी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

### शासकीय कर्करोग रुग्णालयात आधुनिक यंत्रसामुग्रीचे उद्घाटन

## उपचार व दिलासादायक वागणूकीसाठी पुढाकार घ्या- पालकमंत्री शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कर्करोग रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला योग्य उपचार आणि दिलासादायक वागणूक मिळावी यासाठी रुग्णालयातील प्रत्येक डॉक्टर, कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सामाजिक न्याय विभाग मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी केले.

शासकीय कर्करोग रुग्णालयातील डिजिटल मॅमोग्राफी यंत्र व स्तन कर्करोग तपासणी शिबिराच्या उद्घाटन आज पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते झाले. इतर मागास वर्ग कल्याण मंत्री अतुल सावे, विधान परिषद सदस्य आ.संजय केणेकर, माजी महापौर नंदकुमार घोडेले, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ.अरविंद गायकवाड यांच्यासह रुग्णालयातील डॉक्टर परिचारिका वर्ग व इतर तंत्रज्ञ, कर्मचारी उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, कर्करोग रुग्णालयात नवीन उपचार पद्धतीसाठी आवश्यक मशिनरीसाठी निधीची तरतूद वेळोवेळी करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञान व उपचार पद्धतीमुळे आता कर्करोगावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. मुंबई किंवा इतर ठिकाणी जाण्याची गरज नाही. छत्रपती संभाजी नगर येथील कर्करोग रुग्णालयामध्ये मराठवाड्यासह १६ जिल्ह्यातून रुग्ण उपचारासाठी येतात. अशा या रुग्णांना दिलासादायक वर्तनाने सहकार्य करणे आवश्यक असते. कर्करोग रुग्णालयातील सर्व डॉक्टर, तंत्रज्ञ यांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री शिरसाट यांनी केले.

मंत्री अतुल सावे म्हणाले की, शासनाने सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या साह्याने उत्तम सेवा येथे मिळते. रुग्णसेवा ही ईश्वरसेवा असून सर्वांनी रुग्णांना तंत्रज्ञानाच्या साह्याने उपचार करण्यामध्ये सहकार्य करावे,असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी या कार्यक्रमात केले. याप्रसंगी कर्करोग रुग्णालयातील विविध विभागाची पाहणी पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे, आ. संजय केणेकर यांनी केली व तसेच रुग्णांसोबत संवाद साधला. प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ .शिवाजी शुक्रे यांनी केले तर आभार विशेष कार्य अधिकारी डॉ.अरविंद गायकवाड यांनी मानले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199

# भीमनगर भावसिंगपुरा वार्ड क्रमांक (१३) उत्तर अंतर्गत विकास कामांच्या माध्यमातून

## १.३४ रुपये निधीतून सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यासाठी सहा रस्त्यांचे उद्घाटन

## त्रिरत्न बुद्ध महासंघ केंद्र भिमनगरात २१ फुटी बुद्ध मूर्तीचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते अनावरण





**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

५ जुलै २०२५ रोजी भीमनगर भावसिंगपुरा वार्ड क्रमांक १३ (उत्तर) अंतर्गत राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री नामदार संजय भाऊ शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते व या विकास कामाचे आयोजक अॅड बाबा भाऊ तायडे यांच्या पुढाकाराने

१) माता रमाई चौक ते साकेत बुद्ध विहार साई मेडिकल पर्यंतचा प्रमुख मुख्य रस्ता

२) प्राध्यापक पाईकराव सर यांचा घरापासून चा रस्ता

३) भालेराव यांच्या घरापासून चा रस्ता त्रिरत्न चौका पासून ते १५० शे फ टाच्या रस्त्या पर्यंतचा रस्ता ४) त्रिरत्न चौक ते कृष्णा राऊत सर यांच्या घरापर्यंत चा रस्ता प्राध्यापक ५) अनिल दंडाळे सरांच्या घरापासून जेतवन कॉलनी मार्गे गोगाबाबा टेकडी पर्यंतचा पोहोच रस्ता. इत्यादी सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले.

माता रमाई चौकामध्ये सर्वप्रथम माता रमाई चौकामध्ये माता रमाईचे अगरबत्ती हार फुलांनी अभिवादन करण्यात आले.

यासह भीमनगर येथील त्रिरत्न बौद्ध महासंघ केंद्र भिमनगर याठिकानी भव्य अशी २१ फुटी बुद्ध मूर्तीचे अनावरण करण्यात आले, यावेळी बोधीनगर भावसिंगपूरा पडेगाव रोड यावेळी बोधीनगर भावसिंगपुरा पडेगाव रोड ग्लोरिया सिटी जवळ चक्रवर्ती सम्राट अशोक स्तंभ या चौकाचे अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर नंदकुमार घोडिले, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण दीपक खरात, पोलीस निरीक्षक डॉ. विवेक जाधव, कार्यकारी अभियंता म.न.पा कोंबडे, उप अभियंता मनपा चांमले, जिल्हा उपप्रमुख रखमाजी जाधव मामा, सहाय्यक अभियंता मनपा कुलकर्णी, यांच्या प्रमुख उपस्थितीत वरील कार्यक्रमात पार पडले.

५ सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याच्या विकास कामाचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व भव्य दिव्य २१ फुटी बुद्ध मूर्तीचे अनावरण कार्यक्रम यशस्वी साठी विकास कामांचे आयोजक अॅड. बाबा भाऊ तायडे, धम्मचारी विवेकशील, धम्मचारी ललित सिद्धी,धम्मचारी संघवंश, धम्मचारी ललित मुनी, धम्म चारी अक्षयदर्शी, तसेच सुभेदार कदम दादा, सुभेदार आरक दादा, राजूभाऊ जाधव, धम्मानंद सुरासे, प्रा.अनिल दंडाळे, विजय दाणे, दिलीप इंगळेजी, राजेश तिरपुडे, सुरज जाधव, सिद्धार्थ सरोदे, प्रा. धम्मानंद गायकवाड, ओंकार चक्रे, अॅड. जाधव सर, इंजिनीयर मस्के, अनिल गायकवाड , साबळे दादा, डॉ हर्ष बोधि, अॅड, खोब्रागडेर,वडाई , सुशील नवगिरे, तुषार घाडगे, सुमित पवार, प्राध्यापक धावे सर, देवेंद्र वाहने सर, प्रा. सूर्यवंशी सर, सचिन बहुरे, शरद पगारे दादा,आर.पी साळवे , उषाताई वढाई, विजय दामोदर, सि.टी पगारे साहेब, अड.भैय्याजी उराडे,अर्जुन भाऊ तायडे, साबळे साहेब,शांताराम अवचार,अविनाश आडोळे, सुरडकर साहेब, रेखाताई मेश्राम, रूपाली ताई इंगळे, वाहनेताई, रत्नप्रभा वानखडेताई, अनिताताई डोंगरे ताई,मेश्राम ताई,अलकाताई शिरसाट,लताताई थोरात,कांता ताई चाबुकस्वार, विद्याताई भवरे, छाया ताई भवरे, शिंदू बाई सावंत, सुशीला इंगळे मावशी, ऍड करूना जाधव, चारुशीलाताई डोंगरे, सुनंदा रोकडे आई, सुमन दांडगे, तुपे आई,मेघाताई वाहने,सुनंदाताई इंगळे ,वर्षाताई मेश्राम, विद्याताई कदम, कामिनीताई गोरे, वैशाली ताई हिवाळे मॅडम, नयनताई पाटील मॅडम,भारतीताई तायडे मॅडम,वर्षाताई त्रिभुवन मॅडम, अर्चनाताई नवतुरे, पिंकी ताई इंगळे, रागिनीताई गायकवाड मॅडम, लक्ष्मीताई इंगळे, शीलाताई खिल्लारे, दीप अडकणे, विक्रम भाऊ बचके, प्रा. समाधान धांडे सर,प्रा. गजानन दांडगे, सोनकांबळे साहेब,नवनाथ पवार साहेब, प्रभू भाऊ बनकर, सुभेदार घोबले साहेब, धनसिंग बहुरे, ऍड कदम साहेब, कांतीलाल खरात दादा, राहुल दादा वानखेडे, प्रा. मुरलीधर इंगोले, प्रभाकर भवरे, अशोक अवचारमल सर, प्रवीण पाईकराव साहेब, चंदन भाऊ तायडे, निरंजन वानखडे, अशोक शेजवळ, लक्ष्मण वाघमारे, बेस्ट अण्णा, गोंडाने सर, विजय गायकवाड साहेब, बलखंडे साहेब, पवार साहेब, जाधव साहेब, तिघोटे साहेब, विजय दांडगे साहेब, तायडे साहेब,बापूराव साळवे, समीर शेक, प्रा संजय वानखडे,बामणे काका, कानेकर साहेब, बापूराव साळवे, डॉ मिलिंद आठवले, राजेश कांबळे, धम्मानंद जाधव, सय्यद मैनोद्दिन चचा, तागडे सर, अडकिने बी.एच. विदेश इंगळे, कमलाकर साळवे साहेब, गोबले साहेब, संतोष खरात, शाहीर गायकवाड, सनी तायडे, किरण दाभाडे, जोगदंडे, वैभव अडकने, आबेद कुरेशी, जॉन श्रीसुंदर, मुकेश श्रीसुंदर, यावेळी शेकडोच्या संख्येने महिला नागरिक व तरुण उपस्थित होते.











# माणसे जोडणारी नियती आणि गावे जोडणारी यांत्रिकी हिच भाजपाची संस्कृती- आ. सौ. श्वेताताई महाले

## पेठ येथे ३५ कोटी रुपये खर्चून बनवलेल्या पूलाचे आ. श्वेता महाले यांच्या हस्ते लोकार्पण...

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील सर्वात मोठा सण मानल्या जाणाऱ्या देवशयनी आषाढी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर आज दिनांक ६ जुलै रविवार रोजी पुणे नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील मौजे पेठ तालुका चिखली येथे केंद्रीय रस्ते बांधकाम मंत्री नामदार श्री नितीनजी गडकरी यांच्या विशेष मार्गदर्शनाने व सहकार्याने बांधण्यात आलेल्या ३५ कोटी रुपयांच्या पुलाचे चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ श्वेता ताई महाले पाटील यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.



याप्रसंगी बोलताना आमदार सौ श्वेता महाले माणसे जोडणारी नियती, व गावे जोडणारे रस्ते पूल बनवणारी यांत्रिकी या सरकारची व भाजपाची संस्कृती असल्याचे प्रतिपादन केले. यापूर्वी देशातील पायाभूत सुविधांसाठी भविष्यवेधी दृष्टीकोनाचा अभाव असल्यामुळे आपल्या मतदारसंघाचे बरेच नुकसान झाले आहे',लोकांना भेडसावणाऱ्या अडचणी या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यापर्यंतच मर्यादित नव्हत्या तर त्यात शेती, व्यवसाय आणि उद्योगांचाही समावेश होता, याकडे आ. सौ. श्वेताताई महाले यांनी लक्ष वेधले.

मूलभूत सुविधांसोबतच आधुनिक पायाभूत सुविधांची निर्मितीही तितकीच महत्त्वाची असल्याचे आ. सौ. श्वेताताई महाले यांनी सांगितले. जे मतांचे राजकारण करतात ते देशाचे भविष्य लक्षात घेऊन योजना आखू शकत नाहीत, असे त्या म्हणाल्या. यापूर्वी दोन ते तीन वेळा केंद्र सरकारकडून या पुलासाठी निधी मंजूर झाला होता परंतु स्थानिक राजकारण्यांना देशाच्या वाढत्या अर्थव्यवस्थेची नाडी असलेले पूल व रस्ते यांचे महत्त्व न कळल्यामुळे हा पैसा न वापरता परत गेला. गरजा वाढत असताना त्या पूर्ण करण्यासाठी फार लवकर कमी पडणाऱ्या वा सोयीसुविधा निर्माण न करण्याच्या काँग्रेसी संकुचित विचारावर त्यांनी टीका केली. अशा विचारामुळे देशाला मोठी किंमत मोजावी लागली आणि पायाभूत सुविधांच्या उभारणीकडे दुर्लक्ष झाले, असे आ. सौ. श्वेताताई महाले म्हणाल्या. चिखली मतदारसंघात जेथे वाहतुकीची अडचण आहे तेथे पूल व रस्ते बांधून ही समस्या आधी दूर केल्यामुळे इतर अनेक कामे मार्गी लागतात. या पुलाचे बांधकाम करताना जमिनी संपादित करताना सात शेतकऱ्यांच्या गट बदल झाल्यामुळे मोबदल्याच्या काही शिल्लक अडचणी येथे होत्या. या अडचणींचा बाऊ न करता आमदार म्हणून माननीय नितीनजी गडकरी यांच्या कानावर या अडचणी टाकल्या, महाराष्ट्राची सुपुत्र असलेले व देशाचे सर्वात कार्यक्षम मंत्री म्हणून नावलौकिक असलेले नामदार गडकरी साहेबांनी स्थानिक जिल्हाधिकारी यांच्यासोबत बऱ्याच वेळा मीटिंग घेऊन हा पूल कसा तयार होईल त्या संदर्भातील सर्व अडचणी सोडवण्यासाठी मार्गदर्शन व प्रयत्न केले. त्याची परिणीती म्हणून आज या फुलाचे लोकार्पण माझ्या हस्ते होत आहे यासाठी मी नामदार गडकरी साहेबांचे मनापासून आभार मानते असे आमदार असे सौ श्वेता ताई महाले पाटील म्हणाल्या.

मागील २५ वर्षापासून या ठिकाणी योग्य पुलाची व्यवस्था नसल्यामुळे अनेक वेळा जीवितहानीसारखे अपघात झाले. परंतु असंवेदनशील काँग्रेस सरकार आणि त्यांचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांना याबाबतीत कधी सोयर सुतक राहिलेले नव्हते. आम्ही लोकांसाठी सोयी सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहोत तर मागील लोकप्रतिनिधीने आपल्या सोयी सुविधेसाठी लोकांचा वापर केला. एवढ्या महत्त्वाच्या पुलासाठी काही महसुली सुधारणा करून हा फुल बनवणे व त्यायोगे त्या अभावी झालेल्या जीवितहानी रोखणे हा लोकप्रतिनिधीचा प्रयत्न असायला हवा परंतु या अगोदर आलेले पैसे का परत गेले? हा मोठा विषय आहे असे आमदार सौ श्वेता ताई महाले पाटील म्हणाल्या.

अतिशय उपयुक्त सुमारे ३५ कोटी किंमत असलेला हा पूल बनवताना स्थानिक कंत्राटदार,शासकीय अधिकारी व संबंधित पदाधिकारी सगळ्यांनीच अतिशय तत्परतेने व मानवीय दृष्टिकोनातून पूल बनवण्यासोबतच काही सकारात्मक सामाजिक दायित्वाची अधिक कामे जी कंत्राटामध्ये उल्लेखित नव्हती ती सुद्धा केली.

**चिखली खामगाव राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी सी वरील पेठ गावा जवळील पैनगंगा नदीवरील मोठ्या पुलाचे कामा सोबत करण्यात आलेली सामाजिक कामे**

अस्तित्वातील दुर्लक्षित दगडी बंधारा नूतनीकरणः नवीन काँक्रीट भिंतीचे काम करून पाणी अडविले. वरील बाजू साफ करून खोलीकरण करण्यात आले. या बंधाऱ्यात आधी जलसाठा होत नव्हता तो आता ९ सहस्त्र घन मीटर (ढउच) एवढा झाला आहे. प्रचलित दरा प्रमाणे या बंधाऱ्याच्या दुरुस्तीस जवळ जवळ २० लक्ष एवढा खर्च आला असता. या बंधाऱ्यामुळे त्याच्या खालच्या बाजूच्या १५ एकर जमिनीतील विहिरी रिचार्ज झाल्या. आता या १५ एकर जमिनीत रबी चे पीक घेणे शक्य झाले आहे.

रिव्हर ट्रेनिंग मधून निघालेला नदीच्या काठावरील गाळ/माती शेतकऱ्यांनी त्यांच्या मुरमाळ व पोटखराब जमिनीत टाकली. अशा तऱ्हेने एकूण २० एकर जमीन पिकाऊ झाली व आता शेतकऱ्यांनी या जमिनीत सोयाबीन पेरले आहे. पुलाच्या कंत्राटदाराने नदीच्या काठावर साचलेला गाळ मशीनने शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर मध्ये भरून दिला व शेतकऱ्यांनी तो त्यांच्या न पिकणाऱ्या जमिनीत टाकला. काही क्षेत्रात कंत्राटदाराने त्याच्या स्वतःच्या मशिनरीने या गाळाची वाहतूक करून दिली व तो गाळ पसरवूनही दिला. थोडक्यात नदीचे रुंदीकरण होऊन पुराचे पाणी आजूबाजूचे शेतात पसरण्याची शक्यता कमी झाली. व २० एकर जमीन पिकाऊ झाली आणि ती ही विनाखर्चाने।

उतरदा पाझर तलावातून मुरूम काढून या पुलाच्या पोच मार्गाच्या भरावास वापरण्यात आला. यामुळे या पाझर तलावाची साठवण क्षमता ३० सहस्त्र घन मिटर ने वाढली. व जलसंधारणाचे काम विनामूल्य होऊन शासनाची ५४ लक्ष रुपयांची बचत झाली. तसेच याचा फायदा उतरदा या गावाच्या पाणीपुरवठा योजनेस सुद्धा होणार आहे. या पुलाच्या पोचमार्गावर वृक्षारोपण काही लांबीत झाले. उर्वरित लांबीत ते करण्यात येत आहे. या कामाच्या कारारनाम्याप्रमाणे वरील कामे करणे अपेक्षित नव्हते परंतु सामाजिक बांधीलकी ठेऊन कंत्राटदाराने ही कामे विनामूल्य केली. या लोकार्पण प्रसंगी डॉक्टर प्रताप सिंह राजपूत प्रदेश कार्यकारणी सदस्य,श्री अंकुशरावजी पडघान, डॉक्टर कृष्णकुमार सपकाळ तालुका अध्यक्ष, शिवाजीराव देशमुख उपजिल्हाप्रमुख शिवसेना, मायाताई म्हस्के शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख, सरपंच श्री विष्णू शेळके, एकनाथ जाधव,बबनराव राऊत, बळीराम काळे,सौ सिंधु तायडे, श्री अंकुश तायडे, माजी सरपंच सुलाबाई शेळके व महायुतीचे कार्यकर्ते व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रा. वसंत हंकारे, ना. अतुल सावे, मा.आ.श्वेताताई महाले यांच्या उपस्थितीने शिवराणा सेवासंघाचा गुणवंत सन्मान सोहळा हृद्यस्पर्शी व लक्षवेधी ठरला

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शिवराणा सेवासंघ आयोजित गुणवंत विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळा प्रसिध्द वक्ते प्रा. डॉ. वंसत हंकारे आणि दुग्धविकास मंत्री ना. अतुल सावे यांचे उपस्थितीने लक्षवेधी आणि अत्यंत हदयस्पर्शी ठरला. प्रा. हंकारे यांच्या भाषणाने विद्यार्थी वर्गात प्रेरणेची ज्योत प्रज्वलित झाली, हे या कार्यक्रमाचे मोठे यश मानावे लागेल.।





शिवराणा सेवासंघाचेवतीने आयोजित हा सन्मान सोहळा तिरुमला मंगल कार्यालयात शनिवारी प्रचंड गर्दीत पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भरत धुनावत यांनी भुषवले. याप्रसंगी राज्याचे ज्येष्ठ मंत्री ना. अतुल सावे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

ना. अतुल सावे यांनी राजपूत समाजासाठी आर्थीक विकास मंडळासाठी भरीव निधी देण्याची ग्वाही दिली. शहरात महाराणा प्रताप यांचा भव्य पुतळा उभारला ही बाब राजपूत समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे. पुराणवस्तू संग्रहालय देखील राजपूतांचा प्रेरणादायी इतिहासाला उजाळा देत राहील, असे सावे यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रातील प्रसिध्द वक्ते प्रा. डॉ. वसंत हंकारे यांनी आईवडीलांचे महत्व ईश्वरापेक्षा अधिक आहे. खरे म्हणजे आईवडील हेच खरे दैवत आहेत. मुला मुलींनी आई वडीलांचे ऋण व उपकार पावलोपावली मानले पाहीजेत, शिक्षणासाठी आईवडील किती धडपडतात, हे प्रा. हंकारे यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

चिखलीच्या आमदार श्रीमती श्वेता महाले व विद्याधर महाले यांची उपस्थितीही लक्षवेधी ठरली. श्वेता महाले यांचे भाषण दिशादर्शक ठरले. प्रास्ताविक भाषणात शिवराणा सेवासंघ अध्यक्ष. एल. डी. ताटू यांनी या पुरस्कार वितरण सोहळण्याची पार्श्वभुमी सांगीतली. समाजातील मुला मुलींना प्रेरणा मिळावी, त्यांच्या करिअरला योग्य दिशा मिळावी हा उद्देश या कार्यक्रमागे आहे. असे ताटू यांनी सांगीतले.

या कार्यक्रमात दहावी, बारावी, पदवी परीक्षेत तसेच स्पर्धा परिक्षेत सर्वोकृष्ट गुणवत्ता संपादन करणाऱ्या मुलामुलींना, तसेच सामाजीक कार्यकर्ते व पत्रकारांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी, एल. डी. ताटू, ॲड. सुभाष कोकुडे, आनंद बारवाल, भाऊसिंग बैनाडे, दिनेश बलराव, कल्पेश ताटू, अंजली कोकल्डे, प्रविण राजपूत, आंनदसिंग बायस, सचिन ताटू, सोमेश इंगळे, ऋषी ताटू, भोरासिंग राजपूत, प्रेमसिंग धुनावत, नारायण उटाडे, नारायण मरमट, सचिन ताटू, शामसिंगल, भगवान डोभाळ, पदमासिंग राजपूत, महाजन चुगडे, जगत परिहार, गणेश राजपूत, गोवर्धन शेवगण, ईश्वर ढगे.